# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २८६/२०२४ दिनांक- ०६/०८/२०२४.

## “एका महिला वेश्यादलालास ताब्यात घेवुन तीन पिडित मुलींची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश”

दिनांक ०५/०८/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदरला बातमीदाराकडुन महिला नामे रेश्मा शेख हि वेश्याव्यवसाय करीत असुन तिचा मोबाईलवर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, ती गिऱ्हाईकांशी संभाषण करुन पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल रेश्मा शेख हिने सांगितल्याप्रमाणे दारास ढाबा, मुंबई महमदाबाद महामार्ग, काशिगांव, काशिमीरा ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १६.२५ वा. छापा टाकला असता, यातील महिला वेश्यादलाल नामे रेश्मा उस्मान शेख, सध्या रा.रुम नं. ०४ श्रीमती आयेशा यांची चाळ, नं. ०८ डेपो, म्हाडा जवळ, मालवणी मालाड पुर्व मुळ रा. ग्राम चुनाभट्टी, जि. गुलबर्गा, राज्य कर्नाटक हिने ०३ पिडीत मुलींना वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वतः रेश्मा शेख हिने स्वीकारल्याने तिस सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेवुन ०३ पिडित मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत पोहवा/०२०३२ किशोर पाटील यांनी ताब्यातील महिला वेश्यादलाल आरोपी नामे रेश्मा उस्मान शेख, वय २८ वर्षे हिचेविरुध्द सरकार तर्फे फिर्यादी दिल्याने काशिगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. २२८/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३(३), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक ०६/०८/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि./समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, राजु भोईर, शिवाजी पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, चेतनसिंग राजपुत, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे, शितल जाधव व मसुब/अश्विनी वाघमारे, सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.

--------oooo--------